'विकासगंगा वंचितापर्यंत नेणारी'

# मानव साधन विकास संस्थ





**दीपा बांदिवडेकर-कुलकर्णी**

लेखिका व्यवसायाने आर्किटेक्ट असून लिखाणाची आवड आहे. यापूर्वी महाराष्ट्र टाइम्स आणि दैनिक पुढारी मध्ये काही लेख प्रसिद्ध झाले आहेत.

समाजाच्या एकंदर प्रगतीचे मूल्यमापन हे केवळ त्याच्यातील प्रगत भागाकडे पाहून केले जाऊ शकत नाही. समाजातील दुर्बल घटक, अविकसित भाग आणि किमान सोयी सुविधांअभावी दारिद्र्यात खितपत पडलेल्या आपल्या समाजबांधवांची प्रगती ही सुद्धां तेवढीच महत्त्वाची आणि आवश्यक बाब आहे. आज स्वातंत्र्यानंतर एवढ्या वर्षांत एकीकडे आपल्या देशाने अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळविले आहे, पण दुसरीकडे आजही आपल्या करोडो देशबांधवांच्या अन्न वस्त्र निवारा आदि मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. दारिद्र्यरेषेखालील अशी अनेक कुटुंबे आहेत ज्यांना दिवसाला दोन वेळचे अन्न दुरापास्त आहे, कुपोषणाने कित्येक बालके मृत्युमुखी पडत आहेत, कित्येकांचे बालपण फूटपाथवर, रोजंदारीच्या कामावर, दोन वेळच्या अन्नाची तजवीज करण्यामागे दिशाहीन अवस्थेत भरकटत आहे. त्यांच्या विकासाअभावी आपल्या देशाच्या विकासाला पूर्णत्व लाभणार नाही. अशा प्रकारे वर्षानुवर्षे दारिद्र्यात खितपत पडलेल्या आणि त्यामुळे लाचारीचे जीवन जगणाऱ्या, तळागाळातील लोकांना त्यांच्या दुबळ्या मानसिकतेतून बाहेर काढून, मदतीचा हात देऊन, जीवनाचा एक नवीन मार्ग दाखवायचा आणि स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी प्रेरित करायचे या विचाराने प्रेरित होऊन १९९६ साली कोकणचे सुपुत्र विद्यमान केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री श्री. सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली मानव साधन विकास संस्था या संस्थेची स्थापना करण्यात आली. काही समविचारी व्यक्तींच्या सहाय्याने सुरू झालेल्या या संस्थेचे काम आज इतकी वर्षे शासकीय आणि अशासकीय यंत्रणांच्या सहभागाने अविरत सुरू आहे आणि वाढत आहे.

देशातील अविकसित भागांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवलेल्या या संस्थेने आपले पहिले वहिले कार्यक्षेत्र म्हणून कोकण निवडले. विपुल प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती आणि शिक्षणाचा प्रसार असूनही केवळ देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात दुर्लक्षिले गेलेले आणि उपेक्षित राहिलेले कोकण! प्रचंड प्रमाणात पाऊस पडूनही उन्हाळ्याचे शेवटचे दोन तीन महिने पाण्याच्या दुर्भिक्ष्याला सामोरे जावे लागण्याचे दुर्दैव नशिबी असलेले कोकण! परमेश्वराने अलौकिक सौंदर्याचे वरदान दिलेल्या या परशुरामभूमीचे देशातील पर्यटनस्थळांमध्ये म्हणावे तसे स्थान आजही नाही! सुमारे एक तृतीयांश लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कोकणातील तरुण पोटापाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मुंबई पुण्यासारख्या शहरांत स्थलांतर करतात. अशा या कोकणातील सुमारे १२०० गावांचा तत्कालीन राजापूर लोकसभा क्षेत्राचा परिसर काम सुरू करण्यासाठी निवडण्यात आला. राजापूर ही श्री. सुरेश

**देशाच्या प्रगतीमध्ये देशातील वंचितांना सामाविष्ट करून त्याचे जीवन सुधारण्याबरोबरच पुढची पिढी सक्षम बनविण्याचे एक महान कार्य या संस्थेतर्फे सुरू आहे. जनतेच्या समस्यांचा नीट अभ्यास करून, त्यांच्या गरजांचे नीट नियोजन करत केलेला हा विकास आहे.**



प्रभू यांची कर्मभूमी!

विकासाच्या गरजा ओळखून कामाची निश्चित दिशा ठरविण्यासाठी निवडलेल्या सर्व १२०० गावांचा सर्व्हे करण्यात आला. त्यातील एकूण लोकसंख्येची शेतकरी, स्त्रिया, तरुण, मच्छीमार, सेवानिवृत्त आणि मागासवर्गीय अशा सहा गटांत विभागणी करण्यात आली. शिक्षण, महिला सबलीकरण, ग्रामीण विकास, तंत्रज्ञान, पर्यावरण, कृषी, आरोग्य, मनोरंजन, पर्यटन, इद्योग आणि इद्योजक निर्मिती, सर्वांगीण विकास असे मुद्दे निवडून त्यावर काम सुरू करण्यात आले. 'वाडी' हा गावातील काही घरांचा समुह असलेला छोटा भाग, त्यानंतर गावपातळी, त्यापुढे साधारणपणे १० गावांसाठी एक परिवर्तन केंद्र, आणि त्यानंतर जिल्हा पातळी अशा विविध स्तरांवर संस्थेची बांधणी करण्यात आली. त्यामध्ये १२०० गावांसाठी १०५ स्वयंसेवी संस्थांचे जाळे तयार करण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या सहभागामुळे लोकांचा विकासातील सहभाग आणि उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य विनियोग सुनिश्चित होऊ शकला आणि विकासाला निश्चित दिशा देता आली. अशा प्रकारे वेगवेगळ्या स्तरांवर लोकांच्या गरजा ओळखून त्यासाठी निश्चित पावले उचलणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी तयार झाली. प्रत्येक गावातील प्रत्येक वाडीसाठी एक कार्यकर्ता देण्याचे लक्ष्य साधण्यात आले. विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांची ही साखळी पुढे सामान्य जनता आणि सरकार यांच्यातील एक दुवा ठरली.


समाजातील दुर्बल घटकांना फायदा व्हावा अशा अनेक सरकारी योजना असतात. पण बरेचदा त्यांची माहिती गरजू लोकांपर्यंत पोचत नाही. त्यामुळे त्यांना या योजनांचा फायदा मिळत नाही. त्यावर मार्ग म्हणून अशा सर्व योजनांचा अभ्यास करून संस्थेने त्याविषयी एक पुस्तक बनविले आणि प्रत्येक गटातील प्रत्येक गरजू व्यक्तीला ही माहिती समजावण्याची जबाबदारी परिवर्तन केंद्रातील स्वयंसेवकांकडे देण्यात आली. त्यामुळे सरकारच्या लोककल्याणकारी योजना जनासामान्यापर्यंत प्रभावीपणे पोचल्या. तसेच या योजनांमधील जनसामान्यांचा सहभाग, लोकांना या योजनांचा होणारा फायदा यांची खात्रीशीर माहिती सरकारपर्यंत पोचू शकली.

विकासाचे इद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने संस्थेने पुढील पाऊल इचलत केंद्रीय मनुष्यबळ विकास खात्याच्या योजनेअंतर्गत 'जन शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग'ची स्थापना केली. येथे गरजूंना प्रशिक्षण देऊन रोजगार, नोकरी, व्यवसाय यासाठी त्यांच्या कौशल्य विकासावर भर देण्यात आला. आजवर हजारो प्रशिक्षणार्थींना या प्रशिक्षणाचा फायदा झाला आहे. महिला सक्षमीकरणासाठी प्रथम महिलांचे छोटे बचत गट बनविण्यात आले. आज या भागात असे दोन हजारपेक्षा ज़ास्त बचत गट कार्यरत आहेत. यामध्ये संस्थेला लुपिन लॅबोरेटरीज आणि नाबार्डचे सहाय्य मिळाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आणाव येथे कोकणातील पहिल्या नर्सिंग स्कूलची स्थापना केली गेली. येथे नर्सिंगच्या विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. फोर्ड फाइंडेशनच्या सहाय्याने



आजवर सुमारे ५०००पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी ज्ञानदा आणि विचारगंगा असे दोन उपक्रम सुरू करण्यात आले. त्यांचा शुभारंभ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते करण्यात आला होता. आय. सी. आय. सी. आय. आणि मिटकॉनच्या सहाय्याने इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. जीवनातील खेळ आणि कलांचे महत्त्व जाणून संस्थेमार्फत 'संस्कृतिक कोकण' हा उपक्रम राबविण्यात आला. त्याअंतर्गत जिल्हास्तरीय क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद लाभला. विजयी स्पर्धकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आणि नजिकच्या रत्नागिरी जिल्ह्यातील काही गावांमध्ये वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या हेतूने 'ऑर्गनायझेशन ऑफ फार्मास्युटिकल प्रोड्युसर्स'च्या मदतीने एक मोबाईल हॉस्पिटल सुरू करण्यात आले. त्याचा उपयोग या अविकसित भागातील गरीब आणि गरजू रुग्णांना किमान वैद्यकीय चिकित्सा आणि औषधोपचार सुविधा मिळण्यासाठी झाला. तसेच प्रदर्शने, पथनाट्ये, आणि शिबिरे घेऊन स्वच्छतेचे महत्त्व, वेगवेगळ्या आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याविषयी जनजागृती करणे सोपे झाले. याचा लाभ शेकडो रुग्णांना झाला.

असे अनेक उपक्रम राबवले गेले, यशस्वी झाले. तर अनेक उपक्रम सध्या राबविले जात आहेत. संस्थेच्या या गौरवशाली वाटचालीबरोबरच संस्थेचे कार्यक्षेत्रही विस्तारत आहे. मुंबईत आणि उपनगरांत अनेक झोपडपट्टी भागांमध्ये संस्थेने काम सुरू केले आहे. २०१४ साली संस्थेला नवी मुंबईमध्ये कोपरखैराणे येथे ५५०० स्क्वेअर फूट जागा सिडकोतर्फे देण्यात आली. त्यावर प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे काम सुरू आहे. मुंबईत कुर्ला, वडाळा, जोगेश्वरी इत्यादि ठिकाणी संस्थेतर्फे महिलांना मेहेंदी, भरतकाम, फॅब्रिक पेंटिंग, ब्युटी केअर आदिचे प्रशिक्षण दिले जाते. कर्जत येथे संस्थेतर्फे महिलांना पिशव्या बनविणे, मसाले बनविणे तसेच शिवणकामाचे प्रशिक्षण देण्यात आले. ओ. पी. मुंजाळ फाउंडेशनच्या सहाय्याने एप्रिल २०१८ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथे गरजू महिलांना इलेक्ट्रिक सायकलचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक आणि माजी अध्यक्ष तसेच केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू, संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा सौ. उमा प्रभू आणि हिरो सायकलचे श्री. पार्थ चौधरी उपस्थित होते.



देशाच्या प्रगतीमध्ये देशातील वंचितांना सामाविष्ट करून त्याचे जीवन सुधारण्याबरोबरच पुढची पिढी सक्षम बनविण्याचे एक महान कार्य या संस्थेतर्फे सुरू आहे. जनतेच्या समस्यांचा नीट अभ्यास करून, त्यांच्या गरजांचे नीट नियोजन करत केलेला हा विकास आहे. त्यामुळे या योजना परिणामकारकरीत्या राबविल्या जात असल्याचे पहावयास मिळते. यातून तयार होणारे लहान मोठे उद्योजक, प्रशिक्षित तरुणवर्ग, आत्मनिर्भर महिला हेच या संस्थेचे खरे यश आहे. त्यापैकी श्री. नरेश कल्मेतर आणि सुनीता नाईक या दोघांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला. आज ते यशस्वी उद्योजक आहेत. नरेश यांनी जन शिक्षण संस्थेमध्ये हस्तकला व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले आणि त्याच व्यवसायात आज ते अनेकांना रोजगार आणि प्रशिक्षण देत आहेत. सुनीता यांनी टॉप डिटर्जंट हा स्वतःचा ब्रँड बनवून महिला बचत गटांच्या सहाय्याने यशस्वी करून दाखविला. रुक्साना यांनी शिवणकामाचे प्रशिक्षण घेऊन ड्रेस डिझायनिंगमधील आपल्या कल्पकतेचा वापर करत स्वतःचा व्यवसाय सुरू केला. एका पदवीदान समारंभामध्ये सौ. उमा प्रभू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले होते की 'विद्यार्थ्यांनी इथे मिळविलेल्या ज्ञानाच्या सहाय्याने स्वतःची प्रगती साधतानाच मागे राहिलेल्या इतरांनाही मदतीचा हात देत, त्यांना आपल्याबरोबर घेऊन त्यांच्या प्रगतीसाठीही हातभार लावण्याकडे बांधील राहिले पाहिजे.' आज नरेश आणि सुनिता यांच्यासारखे संस्थेचे अनेक विद्यार्थी त्यांचे शब्द सत्यात उतरवताना दिसत आहेत.

* * *

**मानव साधन विकास संस्था,**
**दुसरा माळा, भगिनी मंडळ कुर्ला बिल्डिंग, ब्राह्मणवाडी, मोरेश्वर पाटणकर मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई– ४०० ०७०.**
**फोन. नं. ०२२ २६५२ ३६३५**
**इमेल: infomsvs.org.in**
**वेबसाईट : www.msvs.org.in**